जिल्हाधिकारी कार्यालय बीड

फोन क्र.०२४४२ २२६०४ (जमाबंदी-०१ शाखा) फॅक्स क्र.०२४४२/२२०११

पहा:- १. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचे परिपत्रक क्र.एलएनडी-१०९०/२१५३/प्र.क्र.२०८/ज-१, दि.१२.०२.१९९१

२. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमिन-१०/२००५/प्र.क्र.३८/ज-१,दि.०७.०३.२००६

३. महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग; मंत्रालय मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.स्वप्रके-२००८/प्र.क्र.८५९/योजना -३ दि.१९.०६.२००८

४. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचे परिपत्रक क्र जमीन ०८/२००८/प्र.क्र.११३/ज-१/दिनांक २८.०५.२०१०

५. महसूल व वन विभाग यांचे पत्र क्र.जमीन/०५/२०१०/प्र.क्र.७७/ज-१ दि.०५.०६.२०१०

६. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमीन०३/२०११/प्र.क्र.५३/ज-१ दि.१२.०७.२०११

६. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमीन०५/२०११/प्र.क्र.९०/ज-१,दि.२७.०७.२०११

७. महसूल व वन विभागाची अधिसुचना दिनांक ३१.१२.२०१५

८. उपविभागीय अधिकारी बीड यांचे पत्र क्र.२०१६/आस्था/जमा/कावि-२९३ दि.२९.०३.२०१६ व दि.०४.०१.२०१७.

क्र.२०१६/मशाका/जमा-१/कावि-/सीआर -
जिल्हाधिकारी कार्यालय बीड
दिनांक. ०७.०१.२०१७ .

## आदेश

ज्या अर्थी उपविभागीय अधिकारी बीड यांचे पत्र क्र.२०१६/आस्था/जमा/कावि-२९३ दि.२९.०३.२०१६ व दि.०४.०१.२०१७ अन्वये मौजे समनापुर ता.जि.बीड येथील ग.नं.६७ मधील २ एकर शासकीय जमीन दारिद्रय निर्मुलनाच्या हेतुने सुरु करण्यात आलेल्या सुवर्ण जयंती ग्राम स्वयरोजगार या केंद्र पुरस्कृत योजनेस चालना देण्यासाठी (Rural self Employment Treaning Institute (RSETI) या प्रशिक्षण संस्थेसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, बीड यांना जागा उपलब्ध करुन देणे बाबतचा प्रस्ताव सादर करुन जमीन मंजुर करणेची शिफारस केली आहे.

महसूल व वन विभाग यांची अधिसुचना क्र.जमीन२०१५/प्र.क्र.५५/ज-१ दि.३१.१२.२०१५ मधील ३(ब) नुसार ज्या ठिकाणी राज्य शासनाने रितसर मान्यता प्रदान केलेल्या शासकीय प्रकल्पांकरिता शासकीय जमीन आवश्यक असेल,तर अशा जमिनीचे भोगवटामूल्य कितीही असेल तरी,जिल्हाधिकारी अशी जमीन राज्य शासनाच्या संबंधीत विभागास महसूलमुक्त व सारामाफीने प्रदान करण्यास सक्षम राहतील अशी तरतुद आहे.

सह जिल्हा निबंधक वर्ग-१ बीड यांनी त्यांचे पत्र दि.१३.०४.२०१६ अन्वये मौजे समनापुर ता.जि.बीड येथील ग.नं.६७ मधील २ एकर जमीनीचे मुल्यांकन रक्कम रुपये १३,८०,०००/- (अक्षरी तेरा लक्ष ऐंशी हजार फक्त) असल्याचे कळविले आहे. महसूल व वन विभाग यांची अधिसुचना क्र.जमीन२०१५/प्र.क्र.५५/ज-१ दि.३१.१२.२०१५ मधील ३(ब) तरतुदीनुसार तसेच महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.स्वप्रके-२००८/प्र.क्र.८५९/योजना -३ दि.१९.०६.२००८, महसूल व वन विभाग यांचे पत्र क्र.जमीन/०५/२०१०/प्र.क्र.७७/ज-१ दि.०५.०६.२०१० मधील सुचनांनुसार मौजे समनापुर ता.जि.बीड येथील ग.नं.६७ मधील २ एकर शासकीय जमीन दारिद्रय निर्मुलनाच्या हेतुने सुरु करण्यात आलेल्या सुवर्ण जयंती ग्राम स्वयरोजगार या केंद्र पुरस्कृत योजनेस चालना देण्यासाठी (Rural self Employment Treaning Institute (RSETI) या प्रशिक्षण संस्थेसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, बीड यांना सदर जमिन केंद्र पुरस्कृत योजनेच्या अंमलबजावणीस देणे असल्याने महसूलमुक्त व सारामाफीने देणेबाबत तरतुद आहे.

त्याअर्थी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ नियम २० व ३१ नुसार व महाराष्ट्र जमीन महसूल (शासकीय जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम १९७१ चे नियम ५,६,१५ ला व संदर्भ क्र.२,४,५,६ ला व शासन महसूल व वन विभाग यांची अधिसुचना दि.३१.१२.२०१५ ला अधिन राहुन शासन निर्णयामधील तरतुदीनुसार मौजे समनापुर ता.जि.बीड येथील ग.नं.६७ मधील २ एकर शासकीय जमीन दारिद्रय निर्मुलनाच्या हेतुने सुरु करण्यात आलेल्या सुवर्ण जयंती ग्राम स्वयरोजगार या केंद्र पुरस्कृत योजनेस चालना देण्यासाठी (Rural self Employment Treaning Institute (RSETI) या प्रशिक्षण संस्थेसाठी मुख्य

OFFICE OF THE COLLECTOR BEED

सत्यमेव जयते


जिल्हाधिकारी कार्यालय बीड

फोन क्र.०२४४२/२२२६०४ (जमाबंदी-०१ शाखा) फॅक्स क्र.०२४४२/२२०११


---

कार्यकारी अधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, बीड यांना खालीलप्रमाणे आदेशातील अटी व शर्तीस अधिन राहुन दर्शविण्यात आलेल्या चतु:सिमाप्रमाणे जमीन मंजुर करण्यात येत आहे.

चतु:सिमा

| | |
|---|---|
| पूर्वेस | : ग.नं.६७ पै. उर्वरित क्षेत्र |
| पश्चिमेस | : आहेर वडगांवची शिव |
| दक्षिणेस | : ग.नं.६७ पै. उर्वरित क्षेत्र |
| उत्तरेस | : ग.नं.८० |

अटी /शर्ती

१. जमीन मंजुर केलेल्या दिनांकापासुन जमिनीच्या अतिक्रमणापासुन संरक्षण करण्याची जबाबदारी संबंधीत कार्यालयाची असेल व जमिनीचा वापर विहीत प्रयोजनासाठी करावयाचा नसेल तर सदरील जमीन शासनाकडे कोणतीही नुकसान भरपाई न मागता परत करण्याची जबाबदारी संबंधीतावर राहिल.

२. उपरोक्त जमिनीची आवश्यकता नसेल तेव्हा ती जमीन महसूल खात्यास परत करावी लागेल व त्या जमिनीची विल्हेवाट महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ व त्या खालील वेळोवेळी केलेल्या सुधारणा व नियमानुसार करण्यात येईल.

३. मंजुर केलेल्या जमिनीपैकी काही क्षेत्रावर वृक्ष लागवड करुन त्याची जोपासना करणे आवश्यक आहे.

४. सदर जमीन दिलेल्या प्रयोजनार्थ एक वर्षाच्या आंत उपयोगात आणावी.

५. ज्या कामासाठी जमीनीचे विनियोजन करण्यात आले आहे त्याचा वापर त्याच कारणासाठी केला पाहिजे.

६. जमिनीचे हस्तांतरण ,विक्री,लीजवर खाजगी व्यक्तीस अथवा अन्य खात्यास जिल्हाधिकारी बीड यांचे पूर्वपरवानगी शिवाय करता येणार नाही.

७. आदेशातील व अद्यावत सर्व शासन निर्णयामधील अटी व शर्तीचे पालन करणे संबंधीतावर बंधनकारक राहतील.

८. सदर योजना सुरु असेपर्यंत सदर जमीन संबंधीताच्या ताब्यात राहील. योजना बंद झाल्यानंतर सदर जमीन त्यावरील बांधकामासह जिल्हाधिकारी पुन्हा ताब्यात घेतील.

९. सदर जमिनीचा प्रशिक्षण योजनेव्यक्तीरिक्त अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी वापर करता येणार नाही.

स्वा/-

जिल्हाधिकारी बीड

प्रतिलिपी:

१. मा.सचिव महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सादर.

२. मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर

३. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, बीड

४. उपविभागीय अधिकारी बीड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

५. तहसिलदार बीड यांना देवुन कळविण्यात येते की,उप अधिक्षक भुमी अभिलेख बीड यांचे मोजणी नकाशाप्रमाणे जमिनीचा ताबा देवुन कब्जे पावी व पंचनाम्यासह अहवाल या कार्यालयास सादर करावा.

६. उप अधिक्षक भुमी अभिलेख बीड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव

Telbhaf

जिल्हाधिकारी बीड करिता

D/jama1 2016new/jamin dene babat.